# फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क
# गडचिरोली

## राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक अहवाल

## सत्र 2022-23

## विभाग प्रमुख

**सहा.प्रा. दिपक विश्वनाथ  तायडे**
**सहा.प्रा. हितेश मुरलीधर चरडे**

**प्रति,**

**मा.संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.**

**विषय :-** फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना सत्र- 2022-23 च्या राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक कार्याचा अहवाल स्विकारण्याबाबत. **दिनांक** 22 /07/2023.

**संदर्भ :-** आपले पत्र क्र.GU/NSS/512/2023

महोदय ,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये श्री साईबाबा ग्रामिण विकास संस्था गडचिरोली द्वारे संचालीत फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना सन 2022-23च्या राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक कार्याचा अहवाल सविस्तर अहवाल आपणास सादर करण्यात येत आहे. महाविद्यालयाद्वारे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संपुर्ण सत्रामध्ये विद्यापीठ गडचिरोली तथा महाराष्ट्र शासनाद्वारे निर्गमीत विविध अदेश सुचनांचे पालन करण्यात येऊन कार्यक्रमाचे आयोजन करुन वेळोवेळी त्याचे अहवाल सादर करण्यात आले.

या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करणे , दिनांक दिनांक 9 ऑगस्ट 2022 ते 17 ऑगस्ट 2022 हा पूर्ण सप्ताह स्वराज्य सप्ताह म्हणून साजरा करणे , हर घर तिरंगा अभियान राबविणे , शिक्षक दिन साजरा करणे , दिनांक 17/09/2022 ते 02/10/2022 या कालावधीत राष्ट्र नेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा राबविणे , MINISTRY OF YOUTH AFFAIRS AND SPORTS #Swachh Bharat 2022 MEGA CLEANLINESS DRIVE WEDNESDAY,19 OCTOBER अंतर्गत प्लास्टीक मुक्त गडचिरोली अभियान रबविणे , राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा करणे , दिनांक 26 नोव्हेंबर 2022 ते 6 डिसेंबर 2023 सामाजीक न्याय पर्व अतंर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे, युवक दिन साजरा करणे, विविध महापुरुषांच्या जयंत्या , पुण्यतिथी निमीत्त कार्यक्रमांचे आयोजन करुन अभिवादन करणे तथा त्यांच्या कार्याला उजाळा देऊन विद्यार्थ्यांमध्ये नव चेतना निर्माण करण्याचे कार्य करण्यात आले.

या संपुर्ण कार्यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश के. खंगार यांचे वेळोवेळी सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले तथा सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी , ग्रंथालयीन कर्मचारी यांचे वेळोवेळी सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा सत्र- 2022-23 च्या राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक कार्याचा अहवाल पुढील प्रमाणे .

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची 102 वि जयंती
# दिनांक 1 ऑगस्ट 2022

दिनांक 1 ऑगस्ट 2022 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग फुले - आंबेडकर कॉलेज ऑफ़ सोशल वर्क, गडचिरोली च्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची 102 वि जयंती महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल मध्ये साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. के. खंगार सर होते,प्रमुख मार्गदर्शक डॉ. के. बी. कूडे सर होते. या कार्यक्रमात बि. एस. डब्ल्यू. भाग-1 च्या प्रफुल्ल चलाक, सूरज कोहळे, माधुरी हुकले, प्रियंका पेटकर या विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चारित्र्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. एच. एम. चरडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. कवीता उईके मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला बि. एस. डब्ल्यू. भाग - 1 व भाग - 2 चे सर्व विद्यार्थी उपस्थित होते तसेच सर्व प्राध्यापक रुंद तथा समस्त शिक्षकेत्तर कर्मचारी रुंद उपस्थित होते.

**मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश के. खंगार**




**फुले - आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी**

👇

**http://dhunt.in/zjErh?s=a&uu=0xb0e1bf3da493288d&ss=pd**

**Source : "VIDARBHA NEWS EXPRESS VNX"**

# स्वराज्य सप्ताह
# 9 ऑगस्ट 2022 ते 17 ऑगस्ट 2022

2022 हे भारतीय स्वातंत्र्याचे 75 वे म्हणजेच स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष असल्यामुळे या वर्षीचा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात आणि वेगळ्या पद्धतीने राष्ट्रीय पातळीवर साजरा करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 9 ऑगस्ट 2022 ते 17 ऑगस्ट 2022 हा पूर्ण सप्ताह स्वराज्य सप्ताह म्हणून साजरा करण्याचे निर्देश शासनाद्वारे तथा गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली तसेच माननीय सहाय्यक आयुक्त समाजकल्याण गडचिरोली यांच्याद्वारे प्राप्त झाले. त्या अंतर्गत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा अभियान हे राष्ट्रीय पातळीवर चे अभियान राबवून या अंतर्गत विविध देशभक्तीपर कार्यक्रमाचे आयोजन करणे व दिनांक 13 ऑगस्ट 2022 ते 15 ऑगस्ट 2022 या कालावधीत प्रत्येकाने आपल्या घरावर सन्मानाने तिरंगा फडकवीने अपेक्षित होते. या संबंधी सर्व शाळा महाविद्यालये तथा सर्व शासकीय कार्यालये यांनी सामान्य नागरिकात या अभियान विषयी जन जागृती करणे तसेच विविध देशभक्तीपर कर्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश केंद्र शासन , महाराष्ट्र शासन तथा विद्यापीठ प्रशासन याच्याकडून निर्गमित करण्यात आले.


या अनुषंगाने कार्यक्रमांचे आयोजन तसेच नियोजन करण्यासाठी दिनांक 05ऑगस्ट 2022 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने माहाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.सुरेश के.खंगार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीमध्ये महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद उपस्थित होते. या बैठकीत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम आधिकारी प्रा.दिपक तायडे यांनी मा.सहाय्यक आयुक्त समाजकल्याण गडचिरोली तसेच गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारे प्राप्त निर्देश सर्वांना समजाऊन सांगत कार्यक्रमाची रुपरेषा तयार करण्यासंबधी आपापले अभिप्राय देण्यासंबधी सुचना माननीय प्राचार्यांच्या परवानगीने केली आणि सर्वानुमते खालील प्रमाणे कार्यक्रम घेऊन हर घर तिरंगा अभियान राबविण्याचे ठरविण्यात आले.

| **दिनांक** | **आयोजीत कार्यक्रम** |
|---|---|
| 08/08/2022 :- | वक्तृत्व स्पर्धा. |
| 10/08/2022 :- | देशभक्तीपर रांगोळी स्पर्धा , विविध वार्डामध्ये रॅली चे आयोजन. |
| 12/08/2022 :- | सामुहीक रक्षा बंधन कार्यक्रम , देशभक्तीपर नृत्य सादरीकरण , आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रम, झेंडा वाटप . अंमली पदार्थ विरोधी शपथ कार्यक्रम . |
| 13/08/2022 :- | राष्ट्रीत गायन तथा परिसरात हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन . |
| 14/08/2022 :- | चित्रकला स्पर्धा. |
| 15/08/2022 :- | झेंडा वंदन , देशभक्तीपर चित्रांचे परिक्षण. |
| 16/08/2022 :- | माझा तिरंगा माझी शान जनजागृती अभीयान. |
| 17/08/2022 :- | सामुहीक राष्ट्रगीत गायन ,देश भक्तीपर गीत गायन . |
| 18/08/2022:- | प्रशस्तीपत्र वाटप तथ राष्ट्रगीताने कार्यक्रमाची समाप्ती. |

उपरोक्त प्रमाणे या संपुर्ण कालाधीत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमांचा विस्ताराने अहवाल विद्यापीठाला सादर करण्यात आला आहे.

# शिक्षक दिन  5 सप्टेंबर 2022

श्री. साईबाबा ग्रामीण विकास संस्था द्वारा संचालित फूले - आंबेडकर कॉलेज ऑफ़ सोशल वर्क, गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने  बि. एस. डब्ल्यू. च्या विद्यार्थ्यान द्वारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जयंती निमित्त शिक्षकदिन साजरा करून सर्व प्राध्यापकांना  शुभेच्छा पुष्प देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येऊन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्राध्यापक दिपक वि. तायडे यांनी गुरु शिष्य परंपरेचे महतत्व समजुन सांगितले . सोबतच प्राध्यापक हितेश एम. चरडे यांनी गुरु हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील असा व्यक्ती असतो जो खडतरवाट सुखकर होण्यासाठी सदैव मार्गदर्शन करीत असतो आणि कठीणात कठीण प्रसंगात कसे तक धरून राहावे फक्त एक शिक्षक देऊ शकतो असे मत यावेळी व्यक्त केले तसेच काही विद्यार्थ्यानी शिक्षक दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले याप्रसंगी  महाविद्यालयाचे  समस्त प्राध्यापकरुंद उपस्थित होते.



मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थी


प्राध्यापकांना पुष्पगुच्छ देतांनाचे छायाचीत्र

# रक्तदान शिबिर तसेच कोविड बुस्टर डोस शिबिराचे आयोजन
## दिनांक 12/09/2022

श्री.साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारे संचालित फुले- आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली येथे आज दिनांक 12/09/2022 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्तदान शिबिर तसेच कोविड बुस्टर डोस शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.खंगार हे उपस्थित असून प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.यादवराव गाहाने तथा सर्व प्राध्यापक वृंद प्रशासकीय कर्मचारी व सर्व ग्रंथालयीन कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोली चे बुस्टर डोस पथक अंतर्गत सौ.सारिका तिजारे (ANM ), सौ.गीता डोंगरे (ANM), सौ.विद्या जवादे (आशा वर्कर), सौ.शालिनी बरसिंगे (आशा वर्कर), सौ.प्रियांका पातोडे (आशा वर्कर), सौ.कुंदा गेडाम (गट प्रवर्तक), सौ.शिल्पलाता पुरकर (स्टाफ नर्स), श्री.आकाश चलाख (डाटा एंट्री ऑपरेटर), कु.नेहा गोरडवार (अटेडंट) हे उपस्थित असून रक्त संकलन करण्यासाठी श्री.नरेश कंदखोरी (तंत्रज्ञ), डॉ.अशोक तुमरेटि (रक्त संक्रमण अधिकारी) कु.भरती चोपकर (परिचारिका), श्री.वसंत नाते (सहाय्यक) हे महाविद्यालयात उपस्थित झाले होते. तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित असून उपस्थितांमध्ये 43 विद्यार्थ्यांनी covaxin बुस्टर डोस घेतले. तसेच 9 विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. दिपक व्ही.तायडे तथा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.हितेश एम.चरडे यांनी केले असून सर्व प्राध्यापक वृंद प्रशासकीय कर्मचारी तसेच ग्रंथालयीन कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



रक्तदान करतांना विद्यार्थी




कोविड बुस्टर डोस घेतांना विद्यार्थी




रक्तदान केल्याच्या  प्रमाणपत्रा समवेत विद्यार्थी



# अंधश्रध्दा निर्मूलन काळाची गरज तथा जोडीदाराची विवेकी निवड

## दिनांक 22/09/2022

दिनांक 22/09/2022 रोजी श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारे संचालित फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना विभाग तथा अंधश्रध्दा निर्मूलन समिती गडचिरोली यांच्या वतीने अंधश्रध्दा निर्मूलन काळाची गरज तथा जोडीदाराची विवेकी निवड या विषयावर जाणीव जागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. खंगार हे उपस्थित होते तर प्रमुख मर्गदर्शक म्हणून श्री.माधव बावगे कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती हे उपस्थित होते.तर जोडीदाराची विवेकी निवड या विषयावर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधण्यासाठी कू.रेशमा खडे (कोल्हापूर) , श्री.तुळशीदास शिंदे (नांदेड) हे उपस्थित होते.प्रमुख अतिथी म्हणून श्री.विलास निंबोरकर राज्य कार्यवाह महाराष्ट्र अ.नि.स आणि श्री. विठ्ठलराव कोठारे कार्याध्यक्ष अंधश्रद्धा निर्मूलन समिती गडचिरोली तथा प्रा.विलास पारखी हे उपस्थित असून सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी तथा ग्रंथालयीन कर्मचारी महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.दिपक तायडे तथा प्रा.हितेश चरडे यांनी केले असून सूत्र संचालन प्रवीण टेकाम या विद्यार्थ्याने केले तर आभार प्रदर्शनाची जबदरी ओमदत्त कंचावार या विद्यार्थ्याने पार पाडली. या कार्यक्रमाच्या आयोजन नियोजनात सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी तथा ग्रंथालयीन कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



# राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन

दिनांक 24/09/2022 रोजी श्री.साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारे संचालित फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा करण्यात आला.या निमित्ताने महाविद्यालयात कोविड बुस्टर डोस शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक प्रा.यादवराव गाहने तर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. खंगार ,प्रा.डॉ.विवेक गोर्लावार सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली , प्रा.डॉ. रूपेंद्रकुमार गौर सीनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ, प्रा.प्रज्ञा वनमाली, महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.दिपक तायडे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.हितेश चरडे हे उपस्थित असून बुस्टर डोस देण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोली येथून लसीकरण पथकामध्ये सौ.सारिका तिजारे मॅडम (ANM), कु. सरिता नरोटे मॅडम (LHV ), कु.अर्चना टेकाम मॅडम (ANM) सौ.कविता कोटगले मॅडम (आशा वर्कर) सौ. प्रतिभा पाल मॅडम (आशा वर्कर) हे उपस्थित असून महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी तथा ग्रंथालयीन कर्मचारी उपस्थित असून महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी आचल कुंनघाडकर हिने केले असून आपल्या प्रास्ताविकातून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक दिपक तायडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्थापनेची पार्श्वभूमी समजाऊन सांगत तरुणांनी सदैव समुदायाच्या सेवेसाठी तत्पर राहावे असे आवाहन केले तर आभार प्रदर्शन महाविद्यालयाचा विद्यार्थी चिराग पोरेड्डीवार याने केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन तथा नियोजनात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. खंगार सर सर्व प्राध्यापक वृंद , शिक्षकेतर कर्मचारी तथा ग्रंथालयीन कर्मचारी यांचे सहकार्य लाभले . **मार्गदर्शन करतांना प्राध्यापक प्रा.यादवराव गाहने**



# राष्ट्र नेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा
# 17/09/2022 ते 02/10/2022

दिनांक 26/09/2022 रोजी राष्ट्र नेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा दिनांक 17/09/2022 ते 02/10/2022 अंतर्गत श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारे संचालित फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने  रोजगार कौशल्य विकास व उद्याजकाता या विषयावर मार्गदर्शन पर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून श्री योगेंद्र शेंडे सर सहाय्यक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मार्गदर्शन केंद्र गडचिरोली तथा श्री गणेश चीमनकर सर जिल्हा कौशल्य विकास अधिकारी गडचिरोली हे उपस्थित असून बेरोजगारांना रोजगारासाठी शासनाच्या कोणत्या योजना आहेत तसेच रोजगारासाठी शासनाच्या कौशल्य विकास केंद्रावर कशा प्रकारे नोंदणी करायची याविषयी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी योजनांविषयी आपल्या प्रास्ताविकातून विस्तृत माहिती श्री गणेश चीमनकर जिल्हा कौशल्य विकास अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली तर युवकांच्या रोजगार तथा  बेरोजगार नोंदणी उद्योजगता काळाची गरज  संबंधी श्री योगेंद्र शेंडे सर सहाय्यक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मार्गदर्शन केंद्र गडचिरोली यांनी सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.दिपक तायडे यांनी आलेल्या मान्यवरांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची समाप्ती झाली.

**मार्गदर्शन करतांना श्री योगेंद्र शेंडे सर सहाय्यक आयुक्त**



दिनांक 27/09/2022 रोजी राष्ट्र नेता ते राष्ट्रपिता सेवा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत येणाऱ्या मागास घटकांसाठी विविध शासकीय योजना वर मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे पदवी विभाग प्रमुख प्रा.डॉ.रुपेंद्रकुमार गौर हे उपस्थित होते.तर प्रमुख अतिथी म्हणून श्री.पंकज तलमले (लेखाधिकारी समाजकल्याण गडचिरोली), मा.श्री.राहुल गोविंदलवार (समाजकल्याण निरीक्षक गडचिरोली), मा.डॉ.सोमेश्वर कांकलवार (समाजकल्याण निरीक्षक गडचिरोली), मा.श्री.रमेश पोटे (कार्यालय अधीक्षक समाजकल्याण गडचिरोली), मा.श्री.सचिन मांढरे (समाजकल्याण गडचिरोली), हे उपस्थित असून या कार्यशाळेत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शिष्यवृत्ती योजना , मर्जिन मनी योजना , अनुसूचित जाती आणि नवबौध्द घटक योजना , कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना , गटई स्टॉल योजना, रमाई आवास योजना या महत्त्वपूर्ण योजनांविषयी तसेच शिष्यवृत्ती व समनसंधी केंद्रविषयी सखोल माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून प्रा.सुरेश कंती यांनी कार्यशाळेची पार्श्वभूमी सर्वांना समजाऊन सांगितली तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.दिपक तायडे यांनी केले. आभार प्रदर्शन करतांना राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक विभाग प्रमुख प्रा.हितेश चरडे यांनी आलेल्या मान्यवरांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची समाप्ती झाली.

**कार्यशाळे प्रंसंगी मार्गदर्शन करतांना मा.श्री.राहुल गोविंदलवार साहेब**



दिनांक 28/09/2022 रोजी राष्ट्र नेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा दिनांक 17/09/2022 ते 02/10/2022 अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रोजगार कौशल्य विकास व उद्याजकाता या विषयावर गडचिरोली शहरातील हनुमान वार्ड , फुले वार्ड , सर्वोदय वार्ड , सुभाष वार्ड या भागांमध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याद्वारे समाजातील निराधार , बेघर , दिव्यांग , अनुसूचित जाती नाव बौध्द घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना रमाई घरकुल आवस योजना , संजय गांधी निराधार योजना , गटई कामगार योजना , दिव्यांगासाठी योजना या विविध योजनानविषयी जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले तसेच पथनाट्यचे सादरीकरण करण्यात आले.




**पथनाट्य सादर करतांना विद्यार्थी**



# पोषण आहार तसेच आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रम

दिनांक 29/09/2022 रोजी राष्ट्र नेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गडचिरोली शहरातील गोकुळ नगर अंगणवाडी येथे पोषण आहार तसेच आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रम तथा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याद्वारे समाजातील निराधार , बेघर , दिव्यांग , अनुसूचित जाती नाव बौध्द घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना रमाई घरकुल आवस योजना , संजय गांधी निराधार योजना , गटई कामगार योजना , दिव्यांगासाठी योजना या विविध योजनानविषयी माहितीपर कार्यक्रमाचे आयोजन करन्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सौ.मुन्नी खोब्रागडे ह्या उपस्थित असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. एकता कुमरे वैद्यकीय अधिकारी गोकुळ नगर PHC तथा प्रा. दिपक तायडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाला समुदायातील महिलांचा चांगला प्रतिसाद लाभला.

**मार्गदर्शन कतरतांना डॉ. एकता कुमरे वैद्यकीय अधिकारी**




**मार्गदर्शन करतांना सौ.मुन्नी खोब्रागडे**



## महात्मा गांधी आणि  भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचे जयंती तथा

## राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा दिनांक 17 सप्टेंबर 2022 ते 02 ऑक्टोंबर 2022 चा समारोपीय कार्यक्रम

दिनांक 2 ऑक्टोंबर 2022 रोजी श्री.साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारे संचालित फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी आणि  भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचे जयंती साजरी करण्यात आली या निमित्त महाविद्यालय  परिसर  स्वच्छता कार्यक्रम घेण्यात आला.

राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा दिनांक 17 सप्टेंबर 2022 ते 02 ऑक्टोंबर 2022 चा समारोपीय कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमा साठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.एस.के. खंगार हे उपस्थित असून प्रमुख अतिथी म्हणून IQAC समन्वयक प्रा.विनोद कुकडे तथा पदवी विभाग प्रमुख आणि गोंडवाना विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा. डॉ. रुपेंद्रकुमार गौर तसेच  पदव्युत्तर पदवी विभाग प्रमुख तथा गोंडवाना सिनेट सदस्य प्रा.डॉ.विवेक गिर्लावार हे मान्यवर उपस्थित असून आपल्या मार्गदर्शनात सेवा पंधरवडा विषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या कार्यावर प्रकाश टाकत अध्यक्ष तथा प्रमुख अतिथिंनी या राष्ट्रपुरुषांच्या विचारावर पाऊल टाकून कार्य करण्याची आवश्यकता असल्याचे मत प्रदर्शित केले.तसेच सेवा पंधरवडा च्या समारोपाच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विविध योजनांवर प्रकाश टाकत समाजकार्याच्या प्रत्येक घटकाची ही जबाबदारी आहे की त्यांनी समाजातील गरजू लोकांपर्यंत सामाजिक न्यायाच्या योजना पोहचवाव्या ज्यामुळे त्यांना सहाय्य प्राप्त होऊन त्यांच्या समस्या सुटण्यास मदत होईल.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा ग्रंथालयीन कर्मचारी उपस्थित असून महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.दिपक तायडे यांनी केले असून कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो सहाय्यक विभाग प्रमुख प्रा.हितेश चरडे यांनी केले तर आभार प्रदर्शनाची जबाबदारी BSW भाग 2 चा विद्यार्थी प्रवीण टेकाम यांनी पार पाडत सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार घालुन अभिवादन करतांना मान्यवर




परिसर स्वच्छता करतांना प्राध्यापक तथा विद्यार्थी





**MINISTRY OF YOUTH AFFAIRS AND SPORTS**

**#Swachh Bharat 2022**

**MEGA CLEANLINESSDRIVE**

**WEDNESDAY,19 OCTOBER**

**SAVE THE DATE**

श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारे संचालित फुले आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आज दिनांक 19/10/2022 रोजी महाविद्यालय परिसर ते गडचिरोली शहरातील कारगिल चौक पर्यंत रॅली चे आयोजन करण्यात आले असून प्लास्टिक मुक्त भारत अभियान अंतर्गत प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करून नगर परिषद गडचिरोली कार्यालयाला सुपूर्द करण्यात आला. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सर्व विद्यार्थी उपस्थित असून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.दिपक तायडे तथा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.हितेश चरडे हे उपस्थित असून रॅली च्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका प्रज्ञा वनमाली यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा. प्रज्ञा वनमाली मॅडम**



## पोस्टर च्या माध्यमातुन नागरीकांना प्लास्टीक बंदी आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देतांना विद्यार्थी




## कचरा संकलित करताना विद्यार्थी



## संकलीत केलेला कचरा



## सामाजिक न्याय पर्व
## दिनांक 26 नोव्हेंबर ते 6 डिसेंबर 2022

दिनांक 26 नोव्हेंबर 2022 ते 6 डिसेंबर 2022 या कालावधीत सामाजिक न्याय परवाच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करून भारतीय संविधानाचे महत्त्व पटवून देणे तसेच भारताचे नागरिक म्हणून आपल्याला मिळालेले मूलभूत हक्क आणि भारतीय नागरिक म्हणून आपल्याला बजावयाचे कर्तव्य याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याचे कार्य या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले तसेच सामूहिकरीत्या भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन तसेच गडचिरोली शहरात आयोजित सामूहिक संविधान रॅलीमध्ये सहभाग घेऊन , स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम तसेच वकृत्व स्पर्धेचे आयोजन त्याचप्रमाणे भारतरत्न भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेऊन सामाजिक न्याय पर्व कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

**संविधान रॅली आरंभीचे छायाचीत्र**



## संविधान रॅलीत सहभाग प्रसंगीचे छायाचीत्र




## सामूहिक रित्या भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन



## महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन

दिनांक 28 नोव्हेंबर 2022 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सामाजीक न्याय पर्व अतर्गत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन तसेच त्यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्रा.यादवराव गाहाने उपस्थित असून प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे IQAC प्रमुख प्रा.विनोद कुकडे प्रा.हितेश चरडे प्रा.दिपक तायडे हे उपस्थित होते.या प्रसंगी मान्यवरांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्वातून अभिवादन करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दिपक तायडे यांनी केले तर सूत्र संचालन अभिषेक भोयर या विद्यार्थ्याने केले. आभार प्रदर्शन अमर वैरागडे या विद्यार्थ्याने केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद , सर्व प्रशासकीय तथा ग्रंथालयीन कर्मचारी उपस्थित असून सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.



**मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थी**

**मार्गदर्शन  करतांना प्रा.हितेश एम.चरडे सर**



## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर  महापरिनिर्वाण दिनानिमीत्त अभिवादन
## दिनांक 6 डिसेंबर 2022

दिनांक 6 डिसेंबर 2022 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने सामाजिक न्याय पर्व दिनांक 26 नोव्हेंबर 2022 ते 6 डिसेंबर 2022 या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.सुरेश के. खंगार यांच्या मार्गर्शनात सामाजिक न्याय पर्व कार्यक्रमाचा समारोप भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी करण्यात आला याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे IQAC समन्वयक प्राध्यापक विनोद कुकडे हे उपस्थित असून प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ.विवेक गोर्लावार , सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, प्रा.डॉ.रुपेंद्रकुमार गौर सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली तथा महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. सुधाकर इंगुलकर हे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक रुंद शिक्षकेतर कर्मचारी ग्रंथालयीन कर्मचारी तथा महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. वर्षा तिडके यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. दिपक तायडे यांनी केले तथा आभार  प्रदर्शन प्रा. हितेश चरडे यांनी केले.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करुन अभिवादन करतांना मान्यववर**



# राजमाता जिजाऊ तथा स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी
# दिनांक 12 जानेवारी 2023

दिनांक 12 जानेवारी 2023 रोजी श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारे संचालित फुले आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली येथे महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.सुरेश के. खंगार यांच्या मार्गर्शनात राजमाता जिजाऊ तथा स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली यांप्रसंगी राजमाता जिजाऊ तथा स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आभिवादन करण्यात आले या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.हितेश चरडे हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ.रुपेंद्रकुमार गौर पदवी विभाग प्रमुख सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली तथा राष्ट्रिय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा दिपक तायडे हे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक रुंद शिक्षकेतर कर्मचारी ग्रंथालयीन कर्मचारी तथा महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी चारोळ्या , गीत गायन मनोगतातून आपले मत व्यक्त केले तर राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर मार्गावर चालणे त्यांचे विचार कृतीत आणणे हीच या महान विभूतींना खरी आदरांजली ठरेल असे मत आपल्या आध्यक्षिय मनोगतातून डॉ. रुपेंद्रकुमार गौर यांनी व्यक्त केले तसेच युवक म्हणजे ऊर्जा स्रोत युवक म्हणजे ध्येयनिष्ठ युवक म्हणणे साहस युवक त्याग युवक म्हणजे देशाचे भविष्य अश्या या युवकांना जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे आचरण करणे आवश्यक आहे असे मत कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा.हितेश चरडे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिषेक कोठारे या विद्यार्थ्याने केले तर सूत्रसंचालन रागिणी गुरनुले या विद्यार्थिनीने केले तथा आभार प्रदर्शन पल्लवी ढोलगे या विद्यार्थिनीने केले.

**मार्गदर्शन करतांना डॉ. रुपेंद्रकुमार गौर सर**



# संत गाडगेबाबा यांच्या जयंती निमित्त गडचिरोली शहरातील विविध वार्डांमध्ये परिसर स्वच्छता कार्यक्रम आयोजन

दिनांक 23 फेब्रुवारी 2023 रोजी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारा संचालित फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश के. खंगार यांच्या मार्गदर्शनात संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त गडचिरोली शहरातील सुभाष वार्ड, हनुमान वार्ड, फुले वार्ड व सर्वोदय वार्ड या ठिकाणी परिसर स्वच्छता करून कचरा घंटागाडीमध्ये टाकण्यात आला तसेच स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी तथा संत गाडगेबाबांच्या विचारांना लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी बी.एस.डब्ल्यू .भाग 2 चे विद्यार्थी तथा राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.दिपक तायडे व रा.से.यो.सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.हितेश चरडे हे उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विवध घोषणांच्या माध्यमातून संत गाडगे बाबांचे विचार नागरिकांपर्यंत पोहचवले.

**स्वच्छता करण्यापुर्विचे छायाचीत्र**



## स्वच्छता करतांना विद्यार्थी




## स्वच्छता केल्यानंतरचे छायाचीत्र



## ► समाजकार्य महाविद्यालय तर्फे पथनाट्यच्या माध्यमातून जनजागृती

**विदर्भ न्यूज एक्सप्रेस**



**प्रतिनिधी / गडचिरोली :** गडचिरोली गोंडवाना विद्यापीठ अंतर्गत येणारे श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारा संचालित, फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली येथील बि. एस. डब्ल्यू. भाग २ सेमीस्टर ४ मधील विद्यार्थ्यांनी क्षेत्रकार्या दरम्यान गडचिरोली येथील विवेकानंद नगर येथे व्यसन आणि व्यसनामुळे कुटुंबावर होणारे परिणाम तसेच बेटी बचाओ बेटी पढाओ या विषयी पथनाट्यचे आयोजन करण्यात आले.

यावेळी समुदायातील प्रतिष्ठित नागरिक संजय बोरसरे, सुरेश चिंचोलकर, बाळकृष्ण बांबोळे सेवानिवृत्त B.D.O, वेणूताई खोब्रागडे अगंनवाडी सेविका, उज्वला चव्हाण आशा वर्कर, लता लाटकर माजी सभापती, रजनी मेश्राम, साक्षी चिंचोलकर, प्रदीप बोरसरे, मुनिता खोब्रागडे, रामदास गुरूनुले, उपस्थित होते. तसेच समुदायातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा. दीपक तायडे आणि क्षेत्रकार्य मार्गदर्शक प्रा. हितेश चरडे व प्रा. सुरेश कंती यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत सदर पथनाट्य पार पडले.

तसेच बी. एस. डब्ल्यु भाग २ मधील प्रवीण टेकाम, चिराग पोरेडीवार, शिवानी बैरागी, अंजली वेलादी, शिवानी एम गोटा, शिवानी बी गोटा, मनीषा मंडल, निकिता वाघरे यांच्या सहभागातून कार्यक्रम पार पडले. आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यसन आणि व्यसनामुळे कुटुंबावर होणारे दुषपरिणाम तसेच बेटी बचाओ बेटी पढाओ याबाबत समुदायात संदेश पोहचून जनजागृती करण्यात आली. यावेळी समुदायातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## ► सामाजिक न्याय पर्व निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन

**विदर्भ न्यूज एक्सप्रेस**



**प्रतिनिधी / गडचिरोली :** फुले-आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक न्याय परवाच्या अनुषंगाने महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला दीपप्रज्वलन व माल्यार्पण करून करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. गहाणे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सातपुते स्त्रीरोग तज्ञ, सहेली ट्रायबल अँड रुलर डेव्हलपमेंट फाउंडेशन गडचिरोली व त्यांची टीम उपस्थित होती.

त्यानंतर लगेच विद्यार्थ्यांसाठी वकृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खंगार उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. गोर्लावार सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, प्रा. विनोद कुकडे उपस्थित होते. सदर वकृत्व स्पर्धेचा विषय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण शैक्षणिक धोरण हा होता. त्यात महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला तर वादविवाद स्पर्धेचा विषय आजच्या युवकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार आवश्यक आहेत हा होता. त्यात एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला तसेच यानिमित्याने निबंध स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. निबंधाचा विषय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य हा होता यात प्रामुख्याने ३० विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला.

सदर कार्यक्रमाचे संचलन प्रा. हितेश चरडे यांनी तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका डॉ. वर्षा तिडके यांनी केले. उपस्थितांचे आभार महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवीण टेकाम याने मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालयीन कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थ्यांनी अथक परीश्रम घेतले.

उपरोक्त प्रमाणे सत्र 2022 23 च्या संपूर्ण वर्षामध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध प्रकारचे कार्यक्रम नियोजन करून आयोजित करण्यात आले. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि महाराष्ट्र शासन यांच्याद्वारे निर्गमित आदेशांचे पालन करून त्यांच्याद्वारे निर्देशित सर्व महत्त्वपूर्ण कार्यक्रम यथायोग्य पार पाडण्यात आले व त्या सर्व कार्यक्रमांचे अहवाल त्या त्या वेळी मिळालेल्या आदेशांप्रमाणे तात्काळ कार्यक्रमांच्या समाप्तीनंतर संबंधित कार्यालय तथा राष्ट्रीय सेवा योजना विभाग गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्याकडे सादर करण्यात आले.

सर्व कार्यक्रम नियोजनापासून ते आयोजनापर्यंत पूर्णत्वास येण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. सुरेश के. खंगार सर यांचे सदैव मोलाचे मार्गदर्शन लाभले असून आवश्यकतेच्या वेळी त्यांच्याकडून योग्य त्या परवानगी प्राप्त झाल्या तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक रुंद सर्व  यांचे सुद्धा वेळोवेळी सहकार्य आणि मार्गदर्शन प्राप्त झाले तसेच प्रशासकीय कर्मचारी शिक्षकेतर कर्मचारी तथा ग्रंथालयीन कर्मचारी यांचे सुद्धा वेळोवेळी सहकार्य लाभले.

सर्व कार्यक्रम उपक्रम यशस्वीपणे ज्यांच्याशिवाय पार पडूच शकले नसते असे सर्वच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला त्याचप्रमाणे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांचा सुद्धा सहभाग आणि सहकार्य या कार्यक्रमांमध्ये लाभला या सर्वांशिवाय हे सर्व कार्यक्रम पार पडणे शक्य नव्हते.

माझे सहकारी सहाय्यक कार्यक्रमअधिकारी प्रा.हितेश एम. चरडे यांचे सुद्धा वेळोवेळी मोलाचे सहकार्य लाभले प्रत्येक कार्यक्रमांमध्ये नियोजनापासून आयोजनापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांच्या मिळालेल्या खंबीर साथीमुळे अधिक उत्साहाने सर्व कार्यक्रम पार पाडणे शक्य झाले.

या सर्वांसोबतच राष्ट्रीय सेवा योजना संचालक माननीय डॉक्टर श्याम खंडारे सर गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचे सुद्धा गरजेच्या प्रसंगी मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

अशाप्रकारे संपूर्ण वर्षभरात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे कार्य करण्यात आले असून प्रस्तुत अहवाल राष्ट्रीय सेवा योजना विभाग गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना सविनय सादर करण्यात येत आहे.

**हितेश एम.चरडे कार्यक्रमाधिकारी**
**सहाय्यक कार्यक्रम अधिकारी**

**दिपक व्ही. तायडे**
**कार्यक्रमअधिकारी**